# University of Mumbai

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८.

क्र.परीक्षा/निकाल/ 34-A /२०१७

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, परीक्षांचे अर्ज स्विकारण्या संदर्भातील विद्यापीठ परिपत्रक क्रमांक Exam./Results/491 of 2007 date 8th June 2007 मध्ये नमुद असलेल्या प्रथम सत्र परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्यासाठी निश्चित केलेल्या तारखांमध्ये प्रथम सत्र–२०१८ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी तात्पुरता बदल केला असुन; नवीन सुधारीत तारखांचा तपशील खालील प्रमाणे असुन; यानुसार परीक्षा अर्ज स्विकारण्यात येणार आहे.

| Examination of All Courses (Only for Offline Forms) फक्त Hard Copy स्वरूपात स्विकारण्यात येणाऱ्या अर्जासाठी | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | परीक्षा शुल्क | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | परीक्षा अर्ज व विहित फी विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
| १. | नियमित फी | २८/१२/२०१७ पर्यंत | ३०/१२/२०१७ |
| २. | विलंब शुल्क रू. १००/– | २९/१२/२०१७ ते ०४/०१/२०१८ | ०६/०१/२०१८ |
| ३. | विलंब शुल्क रू. ५००/– | ०५/०१/२०१८ ते ११/०१/२०१८ | १५/०१/२०१७ |

(वरील तारखांचा तपशिल फक्त ज्या शिक्षणक्रमाच्या परीक्षांचे परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पद्धतीने (Hard Copy) स्विकारण्यात येत आहेत त्यांच्यासाठी लागू आहे. (Online घेण्यात येणारे परीक्षा अर्ज सोडून)

पुढे आपल्या माहितीस्तव पुन्हा असेही सुचित करण्यात येते की, जे विद्यार्थी द्वितीय सत्र–२०१७ मध्ये घेतलेल्या पदवी शिक्षणक्रमाच्या सत्र–५ च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र–२०१८ मध्ये होणाऱ्या सत्र–६ या परीक्षेचे प्रवेश अर्ज त्यांनी द्वितीय सत्र–२०१७ मध्ये दिलेल्या सत्र–५ च्या परीक्षेच्या निकालाची प्रतिक्षा न करता वरील तारखांचा तपशीलाप्रमाणे सादर करावेत व जे विद्यार्थी एम.ए./एम.कॉम/एम.एससी. व इतर पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या सत्र–१ व ३ च्या परीक्षांसाठी द्वितीय सत्र–२०१७ मध्ये प्रविष्ठ झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र–२०१८ मध्ये होणाऱ्या सत्र–२ व सत्र–४ परीक्षांसाठीचे परीक्षेचे प्रवेश अर्ज त्यांनी द्वितीय सत्र–२०१७ मध्ये दिलेल्या सत्र–१ व सत्र–३ च्या परीक्षांच्या निकालांची प्रतिक्षा न करता वरील तारखांप्रमाणे सादर करावेत.

तसेच द्वितीय सत्र–२०१७ च्या परीक्षांमध्ये प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र– २०१८ साठीचे परीक्षा प्रवेश अर्ज संबंधीत परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत नियमित शुल्कासहीत सादर करावेत.

जे विद्यार्थी द्वितीय सत्र–२०१७ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण होतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केले असतील अश्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र–२०१८ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच संबंधीत परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत नियमित शुल्कासहीत सादर करावेत.

तरी सदर परिपत्रकाचे तंतोतंत पालन करावे.

स्थळ : मुंबई.
दि. १५ डिसेंबर, २०१७.

(प्रा. (डॉ.) अर्जुन घाटुळे)
प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव

प्रत माहितीस्तव :–

१. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा भवन
२. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग
३. स्वीय सहायक, कुलसचिव, संचालक बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक व वित्त व लेखा अधिकारी